गीतयात्रा

● *पतंग* चित्रपटाचा नायक राजेंद्रकुमार असला तरी घरोब्याच्या संबंधामुळे अधिक गाणी व मध्यवर्ती भूमिका ओमप्रकाशला मिळाली होती. ● *बम्बई का बाबू*मधली सुचित्रा सेनची प्रसिध्द भूमिका आधी मधुबाला करणार होती. ● देव, विजय व चेतन या तिघा आनंदबंधूंनी चित्रपटात एकत्र केलेलं काम हे *कालाबाजार*चं वैशिष्ट्य होतं.


□ इसाक मुजावर

पतंग(१९६०):


नायक म्हटलं की आपल्या चित्रपटात जास्तीत जास्त गाणी त्याच्या तोंडी असतात. पण चित्रगुप्त यांचं संगीत लाभलेला १९६०चा *पतंग* हा चित्रपट मात्र याला अपवाद होता. राजेंद्रकुमार या चित्रपटाचा नायक होता. पण त्याच्याहून ओमप्रकाशच्या वाट्यालाच या चित्रपटातील अधिक गाणी आली होती. लेखक-गीतकार राजेंद्र कृष्ण यांचे बंधू *हर गोविंद* या चित्रपटाचे निर्माते असल्यामुळे या चित्रपटाच्या निर्मितीशी राजेंद्र कृष्ण यांचा जवळचा संबंध होता. ओमप्रकाश त्यांचा जानी दोस्त असल्यामुळे ते अनेकदा त्याला डोळ्यासमोर ठेवूनच चित्रपट कथा लिहायचे. *पतंग* त्यांच्या घरचाच चित्रपट असल्यामुळे या चित्रपटाची कथा त्यांनी ओमप्रकाशलाच डोळ्यासमोर ठेवून लिहिली होती. चित्रपटातील सर्वाधिक म्हणजे चार गाणी त्याच्या वाट्याला आली होती. 'यह दुनिया है पतंग, नीत बदले रंग, कोई जाने ना उडानेवाला कौन है...' हे गाणं या चित्रपटाचे शीर्षक गीत होतं आणि ते दोन भागांत होतं. दोन भागांचं हे शीर्षक गीतच या चित्रपटात ओमप्रकाशवर चित्रित करण्यात आलं होतं. आणि याशिवाय 'तू आप है अपना चोर, काहे रपट करे कोतवाली...' व 'यह दुनिया बडी लुटेरी, ना तेरी है मेरी...' ही आणखी दोन गाणी.

ओमप्रकाशवर चित्रित करण्यात आलेली या चित्रपटातील चारही गाणी रफीच्या आवाजात होती. रफीचा आवाज या चित्रपटात ओमप्रकाशच्या गाण्यापुरताच मर्यादित ठेवण्यात आला होता. आणि राजेंद्रकुमारला मुकेशच्या आवाजात गायला लावण्यात आले होते. पण नायकासाठी गाताना देखील मुकेशच्या वाट्याला या चित्रपटात एकही सोलो गाणे आले नव्हते. 'दिल्ली है दिल हिंदुस्तान का, ये तो तीरथ है सारे जहान का...' व 'तेरी शोख नजर का इशारा, मेरी वीरान रातों का तारा...' ही या चित्रपटातील दोन गाणी मुकेशने लताबाईंच्याबरोबर गायली होती. आणि ती राजेंद्रकुमार व माला सिन्हा यांच्यावर चित्रित करण्यात आली होती. माला सिन्हा या चित्रपटाची नायिका होती. तिच्यासाठी लताबाईंनी या चित्रपटात 'बाग बाने आग दी जब...', 'देनेवाले किसी को गरिबी न दे...' व 'रंग दिल की धडकन भी लाती तो होगी, याद मेरी उनको भी आती तो होगी...' ही दोन गाणी गायली होती. या गाण्यांपैकी 'रंग दिल की धडकन भी लाती तो होगी...' हे गाणे आजही आपली लोकप्रियता टिकवून आहे. पण या गाण्याच्या चालीचे मूळ कोठे दडले आहे माहीत आहे तुम्हाला?

१९५७ साली राजेंद्र कृष्णनी मद्रासच्या ए.व्ही.एम.च्या *मिस मेरी* या चित्रपटाची गाणी लिहिली होती. त्यात रफीने गायलेले



राजेंद्रकृष्ण



मजरूह सुलतानपुरी

'पहले पैसा फिर भगवान, बाबू देते जाना दान...' हे गाणे चांगलेच लोकप्रिय ठरले होते. या गाण्याची चाल राजेंद्र कृष्णना कशी सुचली होती याची कहाणी *मिस मेरी*वर लिहिताना मी तुम्हाला सांगितलीच आहे. हा चित्रपट लिहायला ते मद्रासला गेले. तेव्हा वहिदा रहमानची भूमिका असलेला *राजुल मराई* हा पहिला तेलगू चित्रपट नुकताच पडद्यावर आला होता. या चित्रपटात वहिदाचे फक्त एक नृत्य होते. आणि या नृत्याने व नृत्यावरील गीताने साऱ्या मद्रासला झपाटून टाकले होते. या तेलगू गाण्याची चाल राजेंद्र कृष्णना इतकी आवडली की ही चाल पकडूनच *मिस मेरी*तील 'पहले पैसा फिर भगवान...' हे गाणे त्यांनी लिहिले. आणि या गाण्याने चांगली लोकप्रियतादेखील मिळवली. *पतंग*मधील 'रंग दिल की धडकन भी लाती तो होगी...' हे गाणे लिहीत असताना राजेंद्र कृष्णना पुन्हा *राजुल मराई*तील तेलगू गाण्याची चाल आठवली.

बम्बई का बाबू(१९६०):

राजूल मराई हा तेलगू चित्रपट दक्षिणेत लोकप्रिय ठरला होता. तेव्हा एस.डी.बर्मन मद्रासच्या *सितारों से आगे* या चित्रपटाचे संगीत नियोजन करीत होते. आणि *राजूल मराई*मधील वहिदा रहमानला एकदम हिट बनविणाऱ्या तेलगू नृत्यगीताची चाल त्यांच्या कानावरूनदेखील तेव्हा गेली होती. *बम्बई का बाबू* या चित्रपटाचे संगीत-दिग्दर्शन करीत असताना ही चाल त्यांना एकदम आठवली. आणि याच चालीवरून या चित्रपटातील देखने में भोला है, दिल का सलोना, बम्बई से आया है मेरा बाबू दिवाना...' या गाण्याची चाल त्यांनी बांधली.

राजूल मराई या तेलगू चित्रपटातील गाण्याच्या चालीवरून तयार करण्यात आलेले *मिस मेरी*मधील 'पहले पैसा फिर भगवान...' हे गाणे रफीने गायले होते. *पतंग*मधील 'रंग दिल की धडकन भी लाती तो होगी...' हे गाणे लताबाईंच्या आवाजात होते. तर *बम्बई का बाबू*मधील 'देखने में भोला है दिल का सलोना...' हे गाणे आशाबाईंच्या आवाजात आणि तीन वेगवेगळ्या आवाजातदेखील एकदम हिट ठरले. हे या चालीचे वैशिष्ट्य होते.

किशोरकुमार, रफी, हेमंतकुमार, मन्ना डे, तलत यांचा आवाज एस.डी.बर्मन यांच्या संगीतात अनेक चित्रपटांत ऐकू आला. पण मुकेशचा आवाज त्यांच्या संगीतात किती चित्रपटात ऐकू आला? डोके खाजवून आठवण्याचा प्रयत्न आपण केला तर १९६० पूर्वीच्या त्यांच्या चित्रपटांपैकी *विद्या* व *शबनम* हे दोनच चित्रपट आपल्याला आठवतील. यापैकी *विद्या* १९४८ साली पडद्यावर आला होता. या चित्रपटातच मुकेश एस.डी.बर्मन यांच्या संगीतात सर्वात प्रथम गायला. या चित्रपटात दोन गाणी त्यांच्या आवाजात होती. दोन गाण्यांपैकी 'लाई खुशी की दुनिया...' हे गाणे त्याने सुरैयाबरोबर गायले होते. तर 'बहे ना कभी नैन से नीर... हे गाणे एकट्याने. *विद्या*नंतरचा एस.डी.बर्मन यांच्या संगीतातील मुकेशचा दुसरा चित्रपट म्हणजे १९४९चा

शबनम. या चित्रपटात चार गाण्यांत त्याचा आवाज होता. पण या चार गाण्यांपैकी एकही गाणे त्याच्या एकट्याच्या आवाजात नव्हते. 'तू महल में रहनेवाली...', 'तुम्हारे लिए हुए बदनाम...' व 'प्यार में तुमने धोखा सीखा...' ही तीन गाणी या चित्रपटात त्याने शमशाद बेगमबरोबर गायली होती. तर 'किस्मत में बिछडना था...' हे गाणे गीता दत्तबरोबर. दिलीपकुमार शबनमचा नायक होता. आणि त्या काळात मुकेशचा आवाज त्याचा आवाज बनलेला असल्यामुळे एस.डी.बर्मननी त्याला मुकेशच्या आवाजात गातं केलं होतं. *विद्या*मध्ये देव आनंद मुकेशच्या आवाजात गायला होता. *विद्या*नंतर १९६०च्या *बम्बई का बाबू* या चित्रपटातच प्रदीर्घ कालावधीनंतर 'अब क्या सोचे, कजरा न बह जाये रोते रोते...' या गाण्यात मुकेशचा आवाज ऐकू आला. *विद्या*प्रमाणे या चित्रपटात देव आनंद मुकेशच्या आवाजात गायला मात्र नव्हता. त्याचे गाणे या चित्रपटात देव आनंदवर पार्श्वगीत म्हणून चित्रित करण्यात आले होते. हे गाणे मुकेशच्या आवाजात इतके अजरामर झाले आहे की, या गाण्यात त्याच्याशिवाय अन्य कोणा गायकाच्या आवाजाची आपण कल्पनासुद्धा करू शकणार नाही. पण एस.डी.बर्मनना सुरुवातीला या गाण्यात मुकेशचा नव्हे तर किशोरकुमारचा आवाज घ्यायचा होता. पण इतर नायकांच्यासाठी गायचे तेव्हा त्याने बंद केले होते.

*बम्बई का बाबू*मधील 'चल री सजनी...' हे एकच गाणे मुकेशने गायले होते. आणि मन्ना डेच्या वाट्याला देखील या चित्रपटातील 'तकधम तकधम बाजे दुनिया तेरा ढोल रे...' हे एकच गाणे आले होते. रफीचा आवाज या चित्रपटातील तीन गाण्यांत ऐकू आला होता. या तीन गाण्यांपैकी 'साथी न कोई मंजिल दिया है न कोई महफिल...' हे गाणे त्याच्या एकट्याच्या आवाजात होते. 'पवन चले तो उठे नदी में लहर सी...' व 'आ दिवाना मस्ताना हुआ दिल जाने कहाँ हो के बहार आयी...' ही दोन गाणी आशाबाईंच्याबरोबर. रफीबरोबर दोन गाणी गात असताना आशाबाईंनी या चित्रपटातील 'ऐसे मे कुछ कहा नही जाए, अपना है या बेगाना है...' हे गाणे कोरसबरोबर गायले होते. तर 'देखने में भोला है, दिलका सलोना...' हे गाणे एकटीने. नैनिताल, उटीच्या परिसरात या चित्रपटाचे चित्रण करण्यात आले होते. यामुळे या चित्रपटातील संगीतात एक वेगळाच गोडवा निर्माण झाला होता. या चित्रपटातील एकजात सारी गाणी मजरूह सुलतानपुरींनी लिहिली होती.

हा चित्रपट सेटवर गेला तेव्हा मधुबाला या चित्रपटाची नायिका होती. पण आजारपणामुळे *बम्बई का बाबू*मधील भूमिका तिला सोडून द्यावी लागली. तिच्यानंतर सुचित्रा सेन या चित्रपटाची नायिका बनली. १९५५ साली बिमल रॉय यांच्या *देवदास* या चित्रपटाद्वारा ती बंगालीतून हिंदीत आली. आणि त्यानंतर *चंपाकली*, *मुसाफिर* आणि १९६०च्या *बम्बई का बाबू*, *सरहद्द* या चार हिंदी चित्रपटांत ती चमकली. पण हिंदी चित्रपटातील वातावरणाशी काही तिला एकरूप होता आलं नाही. त्यामुळे *बम्बई का बाबू*नंतर हिंदीकडे पाठ फिरवून तिला सन्मान देणाऱ्या कलकत्त्याच्या बंगाली चित्रपटाकडे तिने पुन्हा धाव घेतली.


शैलेंद्र

***काला बाजार*(१९६०):** *बम्बई का बाबू*बरोबरच एस.डी.बर्मन यांचे संगीत लाभलेले देव आनंदचे आणखी दोन चित्रपट १९६० साली पडद्यावर आले. या दोन चित्रपटांपैकी *काला बाजार* हा चित्रपट देव आनंदच्या नवकेतनचाच होता. देव, विजय व चेतन या तीन आनंद बंधूंनी या चित्रपटात एकत्र भूमिका केली होती. हे या चित्रपटाचे खास वैशिष्ट्य होते. विजय आनंदनी या चित्रपटात भूमिका करीत असताना या चित्रपटाचे दिग्दर्शन देखील केले होते. या चित्रपटाची कथादेखील त्यांचीच होती. आणि चित्रपटगृहाबरोबर चित्रपटाच्या तिकिटाचा काळा बाजार करणाऱ्या तरुणाला डोळ्यासमोर ठेवून या चित्रपटातील नायकाची व्यक्तिरेखा त्यांनी आकाराला आणली होती. ही व्यक्तिरेखा वास्तव स्वरूपात पडद्यावर आकाराला यावी यासाठी लेंगा व सदरा परिधान करून ती देव आनंदने साकार करावी अशी त्यांची इच्छा होती. पण लेंगा व सदरा परिधान करून ही व्यक्तिरेखा साकार करायला त्याने नकार दिला. आणि फुल बाह्यांचा, बंद गळ्याचा शर्ट व ढगळ पॅण्ट हा आपला नेहमीचा देव आनंदी पेहराव परिधान करून या चित्रपटातील नायकाची व्यक्तिरेखा त्याने साकार केली. वहिदा रहमान या चित्रपटात देव आनंदची नायिका बनली होती आणि नंतरच्या काळात *हम दोनो*, *तीन देवियाँ*या चित्रपटांत त्याच्याबरोबर नायिकेची भूमिका साकार करणारी नंदा या चित्रपटात त्याची बहीण बनली होती.

रफी व मन्ना डे या दोन गायकांच्या आवाजात एस.डी.बर्मननी या चित्रपटात देव आनंदला गायला लावले होते. 'सांझ ढली, दिल की लगी थक चली, पुकार के आजा, आजा...' हे एकच गाणे या चित्रपटात मन्ना डेच्या वाट्याला आले होते. आणि ते त्याने आशा भोसलेच्याबरोबर गायले होते. रफीचा आवाज या चित्रपटात चार गाण्यांत ऐकू आला होता. या चार गाण्यांपैकी 'रिमझिम के तराने लेके आयी बरसात, याद आए किसीसे वो पहली मुलाकात...' हे एक गाणे त्याने गीता दत्तबरोबर गायले होते. आणि ते देव आनंद व वहिदा यांच्यावर चित्रित करण्यात आले होते. या गाण्यात एस.डी.बर्मननी गीताच्या आवाजातील 'छिक छिक छया...' या शब्दांचा अधून मधून कौशल्याने उपयोग केला होता.

आपल्याकडील अनेक 'चित्रपटात नायक-नायिकेची पहिली मुलाकात रेल्वेच्या प्रवासात होते. या मुलाखतीत अनेकदा नायकाचे वा नायिकेचे एखादे गाणे येते आणि ते गाणे रेल्वेच्या शिट्टीच्या आवाजात फुलते. *काला बाजार*मधील नायक-नायिकेची पहिली मुलाकात रेल्वेतच होत असल्यामुळे हा चित्रपटदेखील रेल्वेतील गाण्याला अपवाद ठरला नव्हता. देव आनंद व वहिदा रहमान यांच्यावर चित्रित करण्यात आलेले या चित्रपटातील रफीचे 'अपनी तो हर आह एक तुफान है, उपरवाला जानकर अंजान है...' हे गाणे रेल्वेतीलच एक गाणे होते. शैलेंद्र या चित्रपटाचे गीतकार होते. त्यांनी 'उपरवाला' हा शब्द या गाण्यात रेल्वेच्या डब्यात वरच्या बर्थवर असलेल्या नायिकेला उद्देशून मोठ्या खुबीने पेरला होता. आणि एस. डी. बर्मननी रेल्वेच्या इंजिनचा शिट्टीचा आवाज या गाण्यात अधूनमधून मोठ्या खुबीने वापरला होता. 'खोया खोया चाँद, खुला आसमाँ, आँखो में सारी रात जायेगी...', 'सूरज के जैसी गोलाई, चंदा सी ठंडक भी है पाई तेरी धूम हर कही...' ही या चित्रपटातील आणखी दोन गाणी रफीच्या एकट्याच्या आवाजात होती. ●